**ठळक बातम्या**

- विदर्भाच्या अपेक्षेला या अधिवेशनात काय न्याय मिळाला असा विधानसभेत विरोधी पक्षांचा सवाल
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या कुवेत दौऱ्यावर रवाना
- २०२५ सालच्या हंगामासाठी सुक्या खोबऱ्याला प्रतिक्विंटल १२ हजार
- १०० रुपये इतका हमीभाव जाहीर

**आणि**

- दोन जहाल नक्षलवाद्यांचं गडचिरोली पोलिस आणि केंद्रीय राखीव दलापुढे आत्मसमर्पण

**<><><><><>**

विदर्भाच्या अपेक्षेला या अधिवेशनात काय न्याय मिळाला असा सवाल उपस्थित करत राज्यात ४२ मंत्री आहेत पण त्यातील मुख्यमंत्री वगळता उर्वरित मंत्री अजूनही बिनखात्याचेच आहेत अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे गटनेते भास्कर जाधव यांनी केली आहे. राज्य विधानसभेत कालपासून सुरू असलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेत ते बोलत होते.

विदर्भात गेल्या अकरा महिन्यात २ हजार ३३५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, गेल्या तीन वर्षांत सात हजार आत्महत्या झाल्या. शेतमालाला योग्य आणि हमी भाव सरकार देत नाही, सत्ताधारी सदस्यच कृषी विमा योजनेत हजारो कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची तक्रार करीत आहे ही गंभीर

परिस्थिती आहे याची उत्तरे सरकारने द्यावीत अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

मिहान प्रकल्पात अजून मूलभूत सुविधाच नाहीत, विदर्भातील खनिज संपत्तीचा योग्य वापर होत नाही, विदर्भात किती रोजगार आला, टेक्सटाइल पार्क चे काय झालं, राज्यात किती नवी उद्योग आले, ते कुठे उभे राहिले, त्यातून किती रोजगार मिळाला, राज्यातील अनेक एमआयडीसी क्षेत्र उद्योगांच्या प्रतीक्षेत आहेत याची देखील उत्तरे द्या अशीही मागणी त्यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

कारागृहांच्या आधुनिकीकरणाचे काम सरकारने हाती घेतले असून येरवडा, ठाणे, नवी मुंबई येथील कारागृहाच्या आधुनिकीकरणाचे काम हाती घेण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली... तुरुंग सेवेत बदल घडविण्यासाठी विधान सभेने संमत केलेले महाराष्ट्र कारागृहे सुधार सेवा विधेयक, २०२४ हे विधेयक विधान परिषदेत एकमताने संमत करावे असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहाला केले…

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधान परिषदेत महाराष्ट्र कारागृह आणि सुधार सेवा विधेयक २०२४ सादर केलं. विधानसभेत हे विधेयक याआधीच मंजूर झालं आहे. हे विधेयक अंमलात आल्यानंतर राज्यातल्या कारागृहांचे नियम आणि कामकाजाच्या पद्धतीत मोठे बदल होणार आहेत. या विधेयकात कैद्यांची सुरक्षा, कामकाजाची पद्धत, तुरुंगातली व्यवस्था आणि इतर मुद्यांचा समावेश आहे. या विधेयकात कारागृह हे फक्त बंदिगृह नसून

सुधार सेवा असल्याचा उल्लेख केला गेला आहे. याअंतर्गत कारागृह प्रशासनासाठी आणि कैद्यांसाठी कल्याण निधी स्थापन केला जाणार आहे. या निधीतून जामिनासाठी पैसे भरू न शकणाऱ्या कैद्यांना आर्थिक सहकार्य केलं जाणार आहे.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला जे कुणी जबाबदार असतील, त्यांना तातडीनं धडा शिकवण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केली आहे. त्यांनी आज मस्साजोग गावाला भेट दिली आणि देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचं सांत्वन केलं. हे प्रकरण अतिशय गंभीर असून त्याची नोंद राज्य आणि केंद्र सरकारला घ्यावीच लागेल, असं शरद पवार म्हणाले. जे घडलं त्यामुळे सर्वसामान्य लोकांना धक्का बसला असून या घटनेच्या खोलात जाऊन तपास करायची गरज त्यांनी अधोरेखित केली. या प्रकरणामुळे जिल्ह्यात दहशत निर्माण झाली असून सर्वांनी एकत्रितपणे या परिस्थितीचा सामना करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज सकाळी दोन दिवसांच्या कुवेत दौऱ्यासाठी रवाना झाले. गेल्या ४३ वर्षांमधली भारतीय प्रधानमंत्र्यांच्यी ही पहिलीच कुवेत भेट आहे.

भारत आणि कुवेत दरम्यान व्यापार आणि ऊर्जा क्षेत्रात मजबूत भागिदारी असून, पश्चिम आशियातली शांतता, सुरक्षा, स्थैर्य आणि समृद्धीसाठीही

दोन्ही देश प्रयत्नशील असल्याचं प्रधानमंत्र्यांनी या दौऱ्याला जाण्यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

कुवेतमध्ये होणार असलेल्या, अरबी गल्फ कप या स्पर्धेच्या उद्घाटन समारंभासाठी कुवेतचे अमिर, शेख मेशाल अल अहमद अल जाबेर अल सबाह यांनी दिलेल्या निमंत्रणाला प्रतिसाद म्हणून प्रधानमंत्री या दौऱ्यावर गेले आहेत. या निमंत्रणाबद्दल प्रधानमंत्र्यांनी त्यांचे आभार मानले आहेत. या दौऱ्यात प्रधानमंत्री कुवेतचे अमीर, युवराज आणि कुवेतचे प्रधानमंत्री यांच्या भेटी घेतील, तसंच ते कुवेतमध्ये स्थायिक भारतीय समुदायाशीही संवाद साधणार आहेत. थोड्या वेळापूर्वीच ते कुवैतची राजधानी शहर कुवैत इथं पोहोचले. मोदी यांच्या स्वागतासाठी तिथला भारतीय समुदाय उत्साहानं विमानतळावर जमला होता.

**<><><><><>**

निलगिरी आणि सुरत या दोन युद्धनौका नौदलाच्या ताफ्यात दाखल झाल्या आहेत. माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेडने या युद्धनौका भारतीय नौदलाकडे सुपूर्द केल्या. नौदलाच्या वॉरशिप डिझाइन ब्युरोनं या जहाजांची रचना केली आहे. मुंबईतल्या वॉरशिप ओव्हरसिइंग टीमच्या देखरेखीखाली त्या तयार झाल्या आहेत.

आयएनएस निलगिरी  १७ अ प्रकल्पातील पहिली अत्याधुनिक युद्धनौका आहे. ही युद्धनौका शत्रुच्या पाणबुड्या, जहाजविरोधी क्षेपणास्त्र आणि लढाऊ विमानांविरुद्ध सागरी सीमांचे संरक्षण करण्यास सक्षम आहे. ही युद्धनौका

मेक इन इंडिया उपक्रमांतर्गत युद्धनौका रचनेत भारताच्या स्वावलंबनाचं उत्तम उदाहरण आहे.

आयएनएस सुरत १५ ब प्रकल्पातील अत्याधुनिक युद्धनौका आहे. सुरत देखील ७२ टक्के उच्च दर्जाच्या स्वदेशी सामग्रीनं तयार करण्यात आली असून आत्मनिर्भर भारत उपक्रमाचं प्रतिनिधित्व करते. आयएनएस सुरत जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या सुपरसॉनिक ब्रह्मोस क्षेपणास्त्रांसह सुसज्ज आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं २०२५ सालच्या हंगामासाठी  सुक्या खोबऱ्याला प्रतिक्विंटल १२ हजार १०० रुपये इतका हमीभाव निश्चित केला आहे. आर्थिक व्यवहार विषयक केंद्रीय मंत्रिमंडळ समितीनं काल मंजुरी दिली. सुक्या खोबऱ्याच्या किसाकरता दर्जानुसार  प्रति क्विंटल ११ हजार पाचशे ब्याऐंशी रुपये इतका, आणि गोटा खोबऱ्यासाठी प्रति क्विंटल १२ हजार १०० रुपये इतका हमीभाव जाहीर झाला आहे. २०१४ च्या तुलनेत हमीभावात सुक्या खोबऱ्याच्या किसाकरता १२१ टक्के, तर  गोटा खोबऱ्यासाठी १२० टक्के वाढ झाली असल्याचं सरकारनं म्हटलं आहे.

सर्व अनिवार्य पिकांकरता उत्पादन खर्चाच्या किमान दीडपट इतकी किमान आधारभूत किंमत निश्चित केली जाईल अशी घोषणा केंद्र सरकारनं २०१८ - १९ सालच्या केंद्रीय अर्थसंकल्पात केली होती. त्यानुसार ही वाढ केली असल्याचंही सरकारनं म्हटलं आहे.

किमान आधारभूत किंमत योजनेअंतर्गत सुक्या खोबऱ्याच्या खरेदीकरता नाफेड अर्थात, राष्ट्रीय कृषी सहकारी पणन महासंघ आणि आणि राष्ट्रीय

सहकारी ग्राहक महासंघ या संस्था मध्यवर्ती संस्था म्हणून कार्यरत राहतील, असंही सरकारनं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

आज पहिला जागतिक ध्यानधारणा दिन साजरा होत आहे. शांतता आणि कल्याणाच्या भावनेतून तसंच आयुष्य समरसून जगण्यासाठी प्रेरित करणं हे या दिनाचं उद्दिष्ट आहे. संयुक्त राष्ट्रांच्या महासभेनं अलिकडेच यासंबंधी भारताद्वारे सहप्रायोजित प्रस्ताव सर्वसंमतीनं स्वीकार केला होता.

तणाव, हिंसा आणि सामाजिक असंतोषासह अनेक जागतिक आव्हानांना सामोरं जाण्याची क्षमता ध्यानधारणेत असल्याचं मानलं जातं. शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी प्राचीन काळापासून ध्यानधारणा केली जाते. आज या दिनानिमित्तानं न्यूयॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्राच्या मुख्यालयात भारताचे स्थायी प्रतिनिधी पर्वतनेनी हरीश यांनी एका कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं.

**<><><><><>**

धी गोवा हिंदू असोसिएशन  या संस्थेच्या वतीनं दिला जाणारा 'मास्टर दत्ताराम चतुरस्त्र कलावंत' पुरस्कार यंदा  ज्येष्ठ रंगकर्मी मंगेश कदम यांना जाहीर झाला आहे. २१ हजार रुपये रोख, मानपत्र,शाल श्रीफळ या स्वरुपाचा हा पुरस्कार आज मुंबईत दादर इथं प्रदान केला जाणार  आहे.

**<><><><><>**

वेगवेगळ्या गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या आणि शासनानं बक्षीस जाहीर केलेल्या दोन जहाल नक्षलवाद्यांनी काल गडचिरोली पोलिस आणि

केंद्रीय राखीव दलापुढे आत्मसमर्पण केलं. रामसू पोयाम आणि रमेश कुंजाम अशी आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांची नावं आहेत. रामसू पोयामावर चकमक, खून, दरोडा आदी संबंधित १२ गुन्हे दाखल असून त्याच्यावर शासनानं सहा लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं. रमेश कुंजाम २०१९ पासून नक्षली कारवायात सहभागी असून त्याच्यावरही शासनानं दोन लाख रुपयांचं बक्षीस ठेवलं होतं. आत्मसमर्पण योजना सुरु झाल्यापासून आतापर्यंत ६८० नक्षलवाद्यांनी पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं आहे.

**<><><><><>**

सीमा शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी काल रात्री उशिरा केलेल्या कारवाईत मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर एका प्रवाशाकडून ११ किलो पेक्षा जास्त हायड्रोपोनिक गांजा जप्त केला. जप्त कलेल्या अंमली पदार्थाचे बाजारमूल्य अंदाजे ११ कोटी ३२ लाख रुपये असल्याचं सीमा शुल्क विभागानं म्हटलं आहे. या संदर्भात विभागाला माहिती मिळाली होती, त्याआधारे ही कारवाई केली केली. विभागाच्या अधिकाऱ्यांनी विमानतळावर बँकॉक इथून आलेल्या एका प्रवाशाची झडती घेतली, तेव्हा त्याच्या बॅगमध्ये लपवून ठेवलेले अंमली पदार्थ आढळले.

**<><><><><>**

२०२५ च्या ऑस्कर पुरस्कार सोहळ्यात लघुपट श्रेणीत ‘अनुजा’ या भारतीय लघुपटाने स्थान मिळवलं आहे. १८० लघुपटांमधून ‘अनुजा’ची निवड करण्यात आली आहे. सुचित्रा मटाई यांनी या लघुपटाची निर्मिती

केली असून गुनित मोंगा या कार्यकारी निर्मात्या आहेत. तर ॲडम ग्रेव्हस यांनी याचं दिग्दर्शन  केलं आहे.  या लघुपटात अभिनेते नागेश भोसले, सजदा पठाण, अनन्या शानबाग, गुलशन वालिया यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

//<><><><><>//